श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-९, अंक-६ | ऑगस्ट-२०२१ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर जयंती उत्साहात साजरी

दि.२९ जूलै २०२१ रोजी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर यांची ९१ वी जयंती प्रतिवर्षाप्रमाणे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवण येथे साजरी झाली. या कार्यक्रमाला भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर साहेबांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले श्री. माधवराव काजरेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. इंग्लिश मिडियम स्कूलच्या शिक्षिका सौ. सुखदा काजरेकर यांनी ईशस्तवनाने वातावरण मंगलमय केले. शिक्षिका सौ. अश्विनी खांडेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. वालावलकर रूग्णालयाच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला.

सर्वप्रथम वालावलकर–साहेबांबद्दल आपले विचार व्यक्त करताना सिनिअर स्टाफ नर्स सौ. आरती जाधव म्हणाल्या की, भक्त आणि श्रेष्ठ ही बिरुदे साहेबांच्या नावापुढेच एकत्र आली आहेत. त्यांची थोरवी आपल्या जीवनात या भव्य रूग्णालयाच्या रूपाने आहे. मुंबई, पुणे या शहरांसारख्या सुविधा असलेले रुग्णालय या ग्रामीण भागात गोरगरीबांचे जीवन वाचवण्यासाठी उभारले आहे. इथे नर्सिंग स्टाफ म्हणून काम करून माझे जीवन सार्थ झाले.



*भक्तश्रेष्ठ श्री कमलाकरपंत वालावलकरसाहेब*

यानंतर शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव या आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, ‘भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकरसाहेब म्हणजे भगवंताने आपल्या निस्सीम भक्तांना तसेच गोरगरीबांना मदत करण्यासाठी निवडलेले दानशूर, नि:स्वार्थी, परोपकारी तपस्वीच. साहेबांची सद्गुरू श्री दिगंबरदासमहाराजांवरची श्रद्धा इतकी दृढ होती की दैवालाही वाकावे लागले. श्रीमहाराजांनी साहेबांची परीक्षा घेण्यासाठी मोठ्या आर्थिक जबाबदाऱ्या साहेबांवर सोपविल्या. श्रीमहाराजांवरील अत्यंत प्रेम व श्रद्धेमुळे कोणतीही शंका, किंतु, परंतु आड न आणता साहेबांनी सर्व प्रकारे नैतिक प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्या पार पाडल्या. श्रीमहाराज या परमभक्ताच्या भक्तीने तृप्त झाले.

शुन्यातून एवढे मोठे विश्व उभे करून सुद्धा साहेबांनी कधीच स्वत:ला श्रेय घेतले नाही. उलट ‘हे सर्व श्री महाराजांचे आहे, त्यांनीच करवून घेतले’ असे म्हणत. यातून त्यांची पराकोटीची नम्रता दिसून येते. अतिशय साधी रहाणी, शुद्ध सात्त्विक साधा आहार, अंत:करणात सदैव श्री सद्गुरूंचा विचार, गरजवंताला मदत करण्याची




*सौ. सुखदा काजरेकर ईशस्तवन गाताना*

तत्परता, अशा असंख्य परोपकारी गुणवैशिष्ट्यांमुळे महाराजांनी त्यांना 'हिमालयातील तपस्वी' ही उपाधी बहाल केली आहे.

याच समाजोपयोगी कार्याचा एक भाग म्हणजे संस्थेची इंग्रजी माध्यम शाळा – माध्यम इंग्रजी आहे पण संस्कार भारतीय आहेत. इंग्रजी माध्यम का? तर येथील खेडेगावातील मुलांना उंच भरारी मारताना त्यांच्या पंखांना बळ देण्यासाठी, तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढावा, शहरांतील मुलांशी स्पर्धा करताना त्यांची भीती नाहीशी व्हावी, उच्च शिक्षणांत भाषेचा अडसर येऊ नये – यासाठी माध्यम इंग्रजी. गेल्या वर्षी शाळेला CBSE बोर्डाची मान्यता मिळाली. शाळेतील उत्तम दर्जाच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा पहाता भरपूर शुल्क आकारता येईल. परंतु आर्थिक फायदा न घेता अत्यंत विचारपूर्वक, 'लहान वर्ग आणि माफक शुल्क' हे तत्त्व स्वीकारलेले आहे. शाळा चालवताना नफातोट्याचा विचार न करता, 'शिक्षण क्षेत्रात केलेली गुंतवणुक ही राष्ट्रासाठी सगळ्यात महत्त्वाची गुंतवणूक आहे' या एकमेव विचाराने प्रेरित होऊन ही शाळा चालविली जाते.

शिक्षणाचे महत्त्व जाणलेल्या पालकांना ही शाळा हवीहवीशी वाटते कारण येथील कार्यवाही आदर्श आहे. ही कार्यवाही कशी करायची याचे सूक्ष्म मार्गदर्शन करणारे संस्थेचे विश्वस्त हे स्वत: आदर्श आहेत – जे अतिशय दुर्मिळ असते. समाजासाठी नि:स्वार्थी भावनेने काम करायचे एवढेच त्यांना माहित आहे. स्वत:




*प्रमुख पाहुणे श्री. माधवराव काजरेकर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन*



डॉ. सुवर्णा पाटील यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे स्वागत



सिनिअर स्टाफ नर्स सौ. आरती जाधव –
''इथे नर्सिंग स्टाफ म्हणून काम करून माझे जीवन सार्थ झाले.''

कमलाकरपंत वालावलकरसाहेबांनी आपले अखंड आयुष्य सद्गुरूच्या मार्गदर्शनानुसार गरजू बांधवांच्या व गोरगरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी अर्पण केले – असे आदर्श आपल्यासमोर आहेत म्हणून येथील कामकाज निर्मळ आहे.

येथे सद्गुरू श्रीदिगंबरदासमहाराज व भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकरसाहेब आणि त्यानंतर परमपूज्य श्रीकाकामहाराज व श्री. विकास वालावलकरसाहेब या गुरू- शिष्य द्वयीने जो सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, पारमार्थिक विकास केला आहे त्याचा केवळ आस्वाद घेऊन आपण थांबायचे नाही, तर हे कार्य अधिक व्यापक होण्यासाठी हातभार लावायचा आहे. कारण चंदनाचा संग करून पाण्यालाही सुगंध प्राप्त होत असतो. तसेच आपल्या जीवनाची एक समिधा ही वणव्यात जाळण्यापेक्षा या समाजउन्नतीच्या महायज्ञाची धग वाढविण्यास कारणीभूत ठरली तर आपल्याही जीवनाचे सार्थक होईल.'

यानंतर वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी आपले विचार व्यक्त केले. त्या म्हणाल्या, 'सद्गुरू दिगंबरदास महाराजांनी लावलेल्या संस्थेच्या बीजाचं आज कल्पवृक्षात रूपांतर झाले आहे. ते स्वत: महाराज काकामहाराजांच्या रूपाने पाहत आहेत. ह्या विकासकार्यात सद्गुरू श्रीदिगंबरदासमहाराजांचा संकल्प, काका महाराजांची दूरदृष्टी व भगीरथ प्रयत्न आणि वालावलकरसाहेबांचे सद्गुरुप्रेम ह्यामुळेच हा अविष्कार इथे प्रकटला आहे. ह्या विकास कार्यात रुग्णालय, शाळा, क्रीडांगण, सामाजिक उपक्रम यांना खरी गती मिळाली ती इथे काका महाराजांनी सुरू केलेल्या शैक्षणिक उपक्रमांनी. विद्यादान हे अन्नदानापेक्षा श्रेष्ठ, कारण शिक्षणाने जीवनच परिपूर्ण होते. याचा प्रत्यय आपल्याला इथे येतो. खेड्यापाड्यातील अनेक युवक – युवती इथे शिक्षण घेऊन आत्मनिर्भर झाले आहेत. शरीर शक्तीचं, मन भक्तीचं, बुध्दी सत्याची आणि अंत:करण संवेदनशील असणारी पिढी निर्माण करण्याचं काम इथे सुरू आहे.

हे काम सत्यात उतरविणारे लोकच संस्थेचा पाया मजबूत करतात. साहेब हे त्यातलेच एक होते. सद्गुरूंवर नितांत निष्ठा व सकारात्मक विचार ह्यामुळेच ते असामान्य ठरले. दिगंबरदासमहाराजांनी कितीही अशक्य काम सांगितले तरी ते शक्य करण्याचे बळ त्यांच्याकडे होते. हे करताना त्यांना कोणतीही शंका शिवतही नसे.

साहेबांसारखी रत्नं महाराजांच्या खजिन्यात असल्यामुळे कोकणातल्या ह्या दुर्गम भागात विकास करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले. हाच दृष्टीकोन घेऊन इथे सर्व कार्य करत आहेत. त्यामुळे ही संस्था आणखीन नावारूपाला येईलच. कारण चांगल्या संस्थांची ओळख ही त्या ठिकाणच्या कार्यालयीन सुखसोयी, पगार, भव्यता यावर नसून तेथील कर्मचाऱ्यांच्या सकारात्मक दृष्टीकोनावर अवलंबून असते. ह्याचा परिचय इथे दिसतो. ही संस्कृती वरून खाली म्हणजे महाराजांपासून ते संस्थेच्या शेवटच्या कर्मचाऱ्यापर्यंत झिरपत आली आहे.

जे कार्य साकारलेय हे सर्व सद्गुरुभक्तीचं फळ आहे, त्यात माझं काही नाही, हे सर्व महाराजांचं आहे, म्हणून त्यांनाच मी ते अर्पण करतो – ही राजा भोज याच्याप्रमाणेच साहेबांचीही भावना होती. हेच साहेबांचे गुण आपल्यातही स्थापित होवोत.'

या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री. माधवराव काजरेकर यांनी वालावलकर साहेबांच्या सहवासातील आपले अनुभव कथन केले. साहेबांच्या स्वभावाचे विविध पैलू उलगडताना श्री. काजरेकर म्हणाले की, 'आज श्री कमलाकरपंत वालावलकरसाहेबांची जयंती. साहेबांचा जन्म दि. २९ जुलै १९३० रोजी मुंबईत झाला. वडील लक्ष्मणराव व आई सौ. सावित्रीबाई यांना एकूण ५ अपत्ये. श्री. दत्तात्रेय, श्री. रत्नाकर, श्री. कमलाकरपंत हे तीन मुलगे, कु. विमल व कु. कमल अशा दोन मुली. त्यातील कमलाकरपंत हे सर्वात कनिष्ठ अपत्य. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण 'चिकित्सक समूह' या नामवंत शाळेत झाले. शाळेत हुशार व अभ्यासू विद्यार्थी




*शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव –*
*''शाळेचे माध्यम इंग्रजी आहे पण संस्कार भारतीय आहेत.''*

म्हणून ओळखले जात. कॅरम, बुध्दिबळ, टेबल टेनिस हे त्यांचे आवडते खेळ होते. फोर्ट भागातील 'सिद्धार्थ कॉलेज'मधून त्यांनी शास्त्र शाखेची पदवी घेतली. आणि पदवी मिळाल्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या अकाऊंटंट जनरल ऑफिसमध्ये नोकरी मिळाली. तरुण वय, अभ्यासू आणि महत्त्वाकांक्षी स्वभाव, चिकाटी आणि बुद्धिमत्ता यांच्या जोरावर एक अतिशय कार्यक्षम अधिकारी असा त्यांचा अल्पावधीतच नावलौकिक झाला. त्याचबरोबर शांत, प्रसन्न, उदार, आस्थेने चौकशी करणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. वयाच्या २६/२७ व्या वर्षी गिरगावातील श्री. सदाशिवराव तेंडोलकर यांच्या कु. मालुताई या कन्येशी साहेबांचा विवाह महाराजांच्या आशीर्वादाने निर्विघ्नपणे पार पडला. १९६० साली साहेबांना पुत्रप्राप्ती झाली. या काळात सौ. मालुताई आणि चि. विकास यांची प्रकृती बिघडली होती. या प्रसंगी महाराजांनी त्यांना पत्र लिहून बजावले होते की, संसारातील जबाबदाऱ्या पार पाडणे ही ईश्वर सेवा आहे. कारण, साहेब मनाने विरक्त होते व ही विरक्ती त्यांच्यात वैभवाच्या शिखरावरसुद्धा तशीच होती.

बांधकाम व्यवसायात पदार्पण करीत असताना, दादरच्या हृषीकेश इमारत पायाभरणी प्रसंगी, एखाद्या व्यवसायिकामध्ये आवश्यक असणारी खरेदी-विक्रीसाठीची कौशल्ये साहेबांच्या अंगी दिसून आली. साहेब आपली नोकरी सांभाळूनच बांधकाम व्यवसायात कार्यरत होते. काही दिवसांनी साहेबांच्या अंगावर आर्थिक बोजा पडत असल्याने श्रीमहाराजांनी त्यांना प्रकृतीचे कारण देऊन तात्काळ नोकरीचा राजीनामा द्यायला सांगितला आणि साहेबांनी ही गुरूंची आज्ञा तंतोतंत पाळली. या बांधकाम व्यवसायामध्ये लहान-सहान प्रकल्प करून धंदा वाढणार नाही, काहीतरी मोठा घाट घातला पाहिजे; म्हणूनच अंधेरी वर्सोवा येथे एक प्रकल्प सुरू केला. खाडीकाठच्या, दलदलीने भरलेल्या जागेवर मातीचा भराव टाकून प्रकल्प सुरू करणे हे शिवधनुष्य होते जे साहेबांनी श्रीमहाराजांच्या आशीर्वादाने उचलून पेलले. या प्रकल्पास हवा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याने श्रीमहाराजांनी साहेबांना या जागेवर एक सहस्त्रचंडी याग करण्यास सांगून त्या शेजारी समर्थांची प्रतिमा ठेवण्यास सांगितले. भविष्यात येथे स्वामी मंदिर व्हावे असे ही सांगितले. यज्ञानंतर मात्र भराभर सदनिकांसाठी लोकं नावे नोंदवू लागली. कामे झपाट्याने सुरू झाली. त्या दरम्यान डेरवण येथे




*डॉ. सुवर्णा पाटील – ''सद्गुरूंवर नितांत निष्ठा व सकारात्मक विचार ह्यामुळेच वालावलकर साहेब असामान्य ठरले.''*

शिवसृष्टी उभारण्यास जोरात तयारी सुरू केली. या प्रत्येक प्रकल्पाला पैसा उभारणे गरजेचे होते. या पूर्वीच्या कर्जाऊ घेतलेल्या रक्कमांसाठी तगादा होताच आणि लागणारा पैसा उभा करण्याची जबाबदारी मोठ्या विश्वासाने आणि प्रेमाने महाराजांनी साहेबांवरच सोपविली होती. या ना त्या मार्गाने पैसा उभा करून साहेब अडचणीतून मार्ग काढीत असत. अशा प्रसंगी लोकांमध्ये चाललेली कुजबुज श्रीमहाराजांच्या कानावर आली आणि अशांना महाराजांनी उत्तर दिले, 'तुम्हांला वाटत असेल वालावलकर या धंद्यातून उठणार. पण लक्षात ठेवा, एक दिवस मी त्याला याच धंद्यात पैश्याच्या राशीवर लोळायला लावीन!' आणि हेच शब्द खरे ठरले. हळूहळू दिवस पालटले. व्यवसायात गती आली. हाती माती घेतली तरी तिचे सोने होऊ लागले. असे साहेब व महाराज या जीवरूपाने व्यक्ती दोन, परंतू शिवरूपाने एकच असा भाव होता. महाराजांचा शब्द म्हणजे प्रमाण असेच मानून त्यानुसारच साहेब वागत असत.

श्रीमहाराज सतत भक्तातील भक्तीभाव तपासत असत. याचा अनुभव पुढील प्रसंगातून आपल्याला दिसून येतो. एकदा श्रीमहाराजांनी साहेबांकडे मनगटी घड्याळाची मागणी केली. साहेबांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता गुरूंसाठी उत्तमातील उत्तम असे घड्याळ आणले. या वेळी घड्याळाविषयी श्रीमहाराजांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे साहेबांना देता आली नाहीत. प्रश्नांची उत्तरे न मिळाल्याने, घड्याळ न आवडल्याचे सांगून महाराजांनी साहेबांना ते बदलण्यास सांगितले. दुसरे घड्याळ घेताना मात्र साहेबांनी त्या घड्याळाविषयी पूर्ण माहिती करून घेतली. जेव्हा त्यांनी ते महाराजांना दिले तेव्हा प्रश्न न विचारता महाराजांनी घड्याळाचे कौतुकच केले. या प्रसंगातून साहेबांना समजले की, कोणत्याही कृतीपूर्वी त्याबाबत संपूर्ण चौकशी केली पाहिजे. जेव्हाजेव्हा साहेबांवर संकटे येत असत, तेव्हातेव्हा त्या संकटांचे महाराज निवारण करीत असत. याचे एकमेव कारण म्हणजे साहेबांची श्रीमहाराजांवर असलेली नितांत श्रद्धा.

देह ठेवण्यापूर्वी श्रीमहाराजांनी साहेबांना विचारले, अरे तुला आता अमाप संपत्ती मिळणार आहे, त्याचे तू काय करणार आहेस? डबोले साठवणार का? त्यावर साहेब तात्काळ म्हणाले, 'नाही, नाही. ही सर्व संपत्ती आपल्या कार्यासाठी, गोरगरीबांच्या कल्याणासाठी वाटून द्यायची.' यातून साहेबांचा लोकोद्धाराप्रतीचा दृढनिश्चय दिसून येतो. श्रीमहाराजांच्या निर्वाणानंतर काकामहाराजांच्या मार्गदर्शनाखाली साहेबांनी लोकोद्धाराचे अविरत काम चालूच ठेवले. प.पू. श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी समर्थ महाराजांच्या मंदिराच्या भूमिपूजनाप्रसंगी साहेब स्वत: स्वयंसेवकांबरोबर अतिशय हिरीरीने काम करत होते. श्रीमहाराजांची मूर्ती टेम्पोने पुणे मंदिरात




*श्री. माधवराव काजरेकर – ''समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी आपले सर्वस्व समर्पण करणारे श्री. वालावलकरसाहेब एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हटले पाहिजे!''*

आणताना साहेब उत्साहाने स्वत: अनवाणी मूर्तीबरोबर पुण्याला आले. या बरोबरच प.पू. बाबामहाराजांच्या मंदिराच्या बांधकामाला हातभार लावताना स्वत: साहेब व प.पू. श्रीकाकामहाराज हातात घमेले घेऊन स्लॅब भरण्याचे काम अतिशय आनंदात करीत होते. या प्रसंगी साहेबांची विनयशीलता प्रकर्षाने जाणवते.

त्यानंतर पुण्यामध्ये सर्व कार्यक्रमाकरिता लागणारा मोठा मंडप, गुरूशरणम् इमारत, अन्नपूर्णा इमारत झाली. त्याचबरोबर डेरवण येथील शिवसृष्टीची डागडुजी, सावर्डे येथील दत्त देवस्थानाचा जीर्णोद्धार आणि श्री संत वहाळकरबुवा मंदिराचा जीर्णोद्धार असे अनेक संकल्प साहेबांनी पूर्ण केले. १९७६ साली श्रीमहाराजांनी अंधेरी वर्सोवा येथील प्रकल्पादरम्यान पाहिलेल्या स्वामी समर्थांच्या मंदिराचे स्वप्न साहेबांनी मंदिर बांधून सत्यात उतरवले. नंतर श्रीमहाराजांचा एक महत्त्वाचा संकल्प पूर्ण करण्याच्या कार्याला प.पू.काकामहाराज व साहेब जोमाने तयारीला लागले. समाजाला उभारण्यासाठी, गोरगरीबांना उत्तम आरोग्य मिळावे म्हणून डेरवण येथे हॉस्पिटल बांधकामाची सुरुवात श्री वालावलकरसाहेबांच्या हस्ते २४ जुलै १९९५ रोजी भूमीपूजनाने झाली.

आपल्या समाजात लौकिक अर्थाने अनेक श्रीमंत व्यक्ती आहेत पण समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी, तन मन धन खर्ची घालून आपले सर्वस्व समर्पण करणारे श्री. वालावलकरसाहेब एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हटले पाहिजे!' असे विचार श्री. काजरेकर यांनी व्यक्त केले.

यानंतर शाळेतील शिक्षिका सौ. वैदेही जोशी यांनी प्रमुख वक्त्यांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अश्विनी खांडेकर यांनी केले.

# चिपळूण परिसरातील पूरग्रस्तांसाठी ट्रस्टचे मदत कार्य



*भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाचे मदतपथक*

दि. २२ जुलै २०२१ रोजी झालेल्या मुसळधार पावसाने रत्नागिरी जिल्ह्यात अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली. त्यातही चिपळूण शहर व जवळच्या गावांना सर्वाधिक फटका बसला. अनेक बाजारपेठा, निवासी व व्यावसायिक संकुले पाण्याखाली गेली. शहरातील पाण्याची पातळी जवळजवळ बारा-तेरा फूटापर्यंत गेली होती. पहिल्या मजल्यापर्यंतच्या निवासी व व्यावसायिक इमारती सुमारे २४ ते २८ तास या पाण्यात बुडाल्या होत्या. आता बहुतेक बाधित भागात पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असली तरी पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



*घरोघरी जाऊन आरोग्यसेवा*

सर्वत्र घरे व रस्त्यावर गाळ आणि चिखलाचे ढीग साचले आहेत. त्याचबरोबर पूरानंतरचे पुनर्वसनाचे मोठे आव्हान म्हणजे या बाधित लोकांना पिण्याचे पाणी, अन्न, कपडे आणि वैद्यकीय मदत पुरविणे हे आहे.

पुरग्रस्तांना सावरण्यासाठी शासन स्तरावर व खाजगी संस्थांमार्फत मदतीचा ओघ सुरू आहे. डेरवण येथील भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर रुग्णालयाच्या वतीने सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून समाजावर ओढवलेल्या या संकटामध्ये मदतीचा हात पुढे करत दि. २३ जुलैपासून दररोज सुमारे २००० अन्नपाकिटांचे वाटप केले जात आहे. तसेच पूर ओसरल्यावर साथीचे आजार वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन, डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ, सोशल वर्कर्स व रुग्णालयातील अन्य कर्मचारी असे ३० ते ३५ जणांचे आरोग्य पथक दररोज चिपळूण व आजुबाजूच्या खेर्डी, उक्ताड, भुरणेवाडी, सती समर्थनगर, शंकरवाडी या प्रभावित भागात आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, औषध वाटप (डॉक्ससैकिलिन, पॅरासिटमॉल, ॲन्टिबायोटिक्स, मल्टीविटामिन्स, ॲन्टिफंगल ऑइंटमेन्ट्स, आयोडीन ऑइंटमेन्ट्स, ओआरएस, व इतर औषधे) आदी प्रकारे सेवाकार्य करीत आहे. साचलेल्या दूषित पाण्यामुळे अनेकांच्या पायाला झालेल्या जखमांचे ड्रेसिंग केले जात आहे. या मोहिमेत दि. २६ जुलै रोजी चिपळूण शहर, वाणी वाडी, पेठ माप,



छोट्या बाळांची तपासणी - मातांना दिलासा



छोट्या बाळांची तपासणी - मातांना दिलासा



जखमांवर उपचार आणि धास्तावलेल्या मनावर धीराची फुंकर

तांबटआळी येथे ८२५ पूरग्रस्तांनी लाभ घेतला. दि. २७ जुलै रोजी शंकरवाडी, वडार कॉलनी, मुरादपुर येथे ६५० पूरग्रस्तांना तर दि. २८ जुलै रोजी कंळबस्ते, दळवटणे येथे ६८५ पूरग्रस्तांना मदत पोहोचवण्यात आली. संस्थेमार्फत सेवाभावी वृत्तीने करण्यात आलेल्या या कार्याबद्दल चिपळूणवासीयांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.




अन्नपाकिटांचे तातडीने वितरण





मदतकार्यातील क्षणचित्रे

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# गोगटे-जोगळेकर महाविद्यालय आणि भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, डेरवण यांच्यात सामंजस्य करार

गोगटे-जोगळेकर महाविद्यालय आणि भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, डेरवण यांच्यात दि. ३० जून २०२१ रोजी एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारान्वये फॅकल्टी-स्टुडंट एक्स्चेंज, स्टुडंट इंटर्नशिप, संशोधन सहकार्य, अशा विविध उपक्रमांचे आयोजन दोन्ही संस्थांकडून संयुक्तपणे करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील आरोग्यविषयक प्रश्न सोडविण्यासाठी आणि रोगसूचक सामग्री स्वस्त आणि सुलभ बनविण्यासाठी आवश्यक ते संशोधन करण्यावर या करारात प्रामुख्याने भर देण्यात आला आहे.

या करारासाठी वालावलकर महाविद्यालयातर्फे संचालक डॉ. सुवर्णा पाटील, टाटा मेमोरिअल सेंटरशी संलग्न वरिष्ठ संशोधक डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. नेताजी पाटील, डॉ. रोहित भट, डॉ. अनुप निलावर उपस्थित होते. गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, डॉ. यास्मिन आवटे, डॉ. चित्रा गोस्वामी, विविध विभागप्रमुख यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. हा सामंजस्य करार प्रत्यक्षात येण्यासाठी गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातर्फे डॉ. सुरेंद्र ठाकूरदेसाई, डॉ. अपर्णा कुलकर्णी, आणि डॉ. विवेक भिडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



*सामंजस्य करार परस्परांकडे सुपूर्द करताना (डावीकडे) गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पी. पी. कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी आणि (उजवीकडे) डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. नेताजी पाटील, डॉ. रोहित भट, डॉ. अनुप निलावर आदी.*

गोगटे-जोगळेकर महाविद्यालय हे कोकणातील नामवंत महाविद्यालय असून त्याने 'नॅक' मूल्यांकनात सतत चार वेळा 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे. महाविद्यालयाने कला, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्य, आणि संशोधन अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे; तसेच महाराष्ट्रातील तसेच देशातील अनेक नामवंत संस्थांबरोबर असे सामंजस्य करार करून अनेक शैक्षणिक आणि सहशैक्षणिक उपक्रमांचे आयोजन यशस्वीपणे केले आहे.

'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स'शी संलग्न भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि संशोधन केंद्र, डेरवण येथे अनेक आरोग्यविषयक तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मूलभूत संशोधन प्रकल्प सुरू असून या दोन नामवंत संस्थांमध्ये करण्यात आलेल्या या सामंजस्य कराराने ग्रामीण आरोग्य क्षेत्रातील जटील समस्यांचे निराकरण होण्यास उपयुक्त ठरणारे संशोधन करणाऱ्या प्रकल्पांना चालना मिळेल असा विश्वास उभयपक्षी व्यक्त करण्यात आला.




*गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ उभय संस्थांचे पदाधिकारी - एका नव्या नात्याची सुरुवात*

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०